51-A

Maharashtra Airport Development Co. Ltd.
Inward No. 7716
Date 3.1.19
Addl. collector
3.1.19

चंद्रपूर विमानतळाच्या विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासंदर्भात.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. मविवि-१२१७/प्र.क्र.२५५/२८-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. २१ डिसेंबर, २०१८.

वाचा :१. समक्रमांक शासन निर्णय दि.२६ एप्रिल २०१८
२. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं-२०१७/प्र.क्र.३६/भुसं/११२५, दि.२६ नोव्हेंबर २०१८

**प्रस्तावना :**

चंद्रपूर जिल्ह्यातील मौजे विहीरगाव व मौजे मुर्ती, ता.राजुरा येथील जागेवर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून ग्रीनफील्ड विमानतळ उभारण्यासाठी विकास कामांना उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तुत शासन निर्णयात चंद्रपूर विमानतळाच्या विकासासाठी करावयाच्या भूसंपादनाबाबत आवश्यक जमिनीचा तपशील देण्यात आला आहे. तथापि, आता भूसंपादनासाठीच्या पहिल्या टप्प्याच्या क्षेत्रामध्ये सुधारित मोजणीनुसार बदल झाला असल्याचे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी शासनास कळविले आहे. त्याअनुषंगाने, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कळविल्याप्रमाणे संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयामधील भूसंपादनाच्या पहिल्या टप्प्यातील क्षेत्रामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

चंद्रपूर येथील प्रस्तावित ग्रीनफील्ड विमानतळाची उभारणी/ विकास करण्यासाठी करावयाच्या भूसंपादनाबाबत दि.२६ एप्रिल २०१८ रोजीच्या शासन निर्णयामधे नमूद पहिल्या टप्प्यातील क्षेत्राच्या तपशीलात सुधारित मोजणीनुसार बदल करण्यात येत असून संपादित करावयाचे सुधारित क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

| टप्पा | शासकीय जमीन | | | खाजगी जमीन | एकूण जमीन |
|---|---|---|---|---|---|
| | सरकारी जमीन | वनजमीन | एकूण | | |
| पहिला | ९९.७१ (हे.आर.) | ७५.२४ (हे.आर.) | १७४.९५ (हे.आर.) | ११६.४८ (हे.आर.) | २९१.४३ (हे.आर.) |
| | २४६.३८ (एकर) | १८५.९२ (एकर) | ४३२.३० (एकर) | २८७.८२ (एकर) | ७२०.१२ (एकर) |

| जमिनीचा प्रकार | गावाचे नाव | कक्ष क्रमांक | शासन निर्णय दिनांक २६.०४.२०१८ नुसार क्षेत्र | प्रत्यक्ष मोजणीनुसार क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकर | एकर | हे.आर. |
| वन जमीन | मुर्ती | ५९३ | | ६८.९०७ | २७.८३० |
| | | २०० | | ४.११ | १.६६० |
| | विहीरगाव | १७३ | | ११३.२७७ | ४५.७५० |
| | एकूण | ३ | ८३.०० | १८५.९२ | ७५.२४० |
| सरकारी जमीन | | | २१५.६८ | २४६.३८ | ९९.७१ |
| खाजगी जमीन | | | ४२१.३२ | २८७.८२ | ११६.४८ |
| | | एकूण | ७२०.०० | ७२०.१२ | २९१.४३ |

३. उपरोक्त तक्त्यात नमूद क्षेत्रानुसार भूसंपादनाची कार्यवाही जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालयाने तातडीने करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८१२२७११३०४०७३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(सं.अ.बागेश्वर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक
२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव( उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
१२. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई

१३. महालेखापाल, ( लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
१५. सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
१६. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१९. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती.